# मोगरकशा तलावाच्या दौऱ्यातील अनुभव ३

श्रीराम वनवासाला गेले होते तेव्हा भरताने श्रीरामाच्या पादुका राजसिंहासनावर ठेवून चौदा वर्षे त्यांच्या नावावे चांगल्या प्रकारे राज्यकारभार चालविला होता असा रामायणात उल्लेख आहे. ही सत्य युगातील गोष्ट आहे. परंतु ह्या कलियुगात महानत्यागी बाबा जुमदेवजींच्या पादुका मोगरकशा तलावाच्या किनाऱ्यावर राहिल्याने तलावात तरंगणाऱ्या नावेत पाणी भरल्यानंतरसुध्दा नाव तलावात बुडाली नाही आणि ती तरंगत राहिली. हा फार मोठा साक्षात्कार आहे परमेश्वरी कृपेचा! दिनांक ५-४-७८ ला मोगरकशा तलावात घडलेली एक सत्य घटना आहे. कपोल कल्पित कथा नाही. ही फक्त एक गोष्ट नाही, सत्य घटना आहे.

दिनांक १-४-१९७८ ला महानत्यागी बाबा जुमदेवजी आपल्या सात सेवकांसोबत नागपूर-रामटेक वरुन भंडारबोडी येथील परमात्मा एक सेवक दुध उत्पादक सहकारी संस्थेत पोहचले. ही संस्था बाबांच्या मार्गदर्शनाने प्रस्थापित झालेली आहे. ह्या संस्थेत सत्य व्यवहार चालतो. सेवकांसोबत बाबा तेथे पोहोचल्यावर तिथल्या सेवकांनी बाबांचे स्वागत केले आणि जेवण झाल्यानंतर रात्री बाबांनी तेथेच मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी दिनांक २-४-१९७८ ला पाच बैलगाड्या जोतून बाबा सेवकांसोबत कान्द्री गावाला गेले आणि त्या दिवशी तेथे मुक्काम केला. दिनांक ३-४-१९७८ ला बाबा सेवकांसोबत पंचाळा गावाला गेले. तेथे सर्वांनी जेवण केल्यानंतर त्यांनी रात्रभर तेथेच मुक्काम केला. दिनांक ४-४-१९७८ ला बाबा सेवकांसोबत जंगलातून मंगरली गावाला पोहचले. त्या दिवशी बाबांच्यासोबत बाई-माणसे मिळून पस्तीस सेवक होते. हे गाव घनदाट जंगलात वसलेले आहे. त्या गाचाच्या दोन सेवकांच्या घरी सर्वांच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली. जेवण झाल्यानंतर रात्रीला तेथेच मुक्काम झाला. दिनांक ५-४-१९७८ ला सकाळीच त्या गावचे श्री. शेरकी नावाचे सेवक महानत्यागी बाबा जुमदेवजींना म्हणाले, 'बाबा, येथून दहा मैलांवर मोगरकशा नावाचा तलाव आहे. त्याच्या चारही बाजूंना दाट जंगल आहे. तेथे आपण आमच्याबरोबर वनभोजनास चलावे अशी विनंती आहे.' त्यावर बाबा ठीक आहे असे म्हणाले. सेवकाने वनभोजनाला जाण्याची तयारी केली. सामान घेऊन जाण्याकरिता बैलबंडीची

आवश्यकता होती. शेरकी नावाच्या सेवकाच्या घरी बंडी होती पण बैल म्हातारे होते. त्यात एक बैल असा पण होता की त्याला बंडीला जुंपल्यावर तो खाली बसला की उठतच नसे. त्याच्यासमोर ट्रक आली तरी तो उठत नसे. ही गोष्ट जेव्हा बाबांच्या कानी आली तेव्हा बाबा म्हणाले, बंडीला त्या बैलालाच जुंपा व लवकर वनभोजनास चला. सेवकाने एक बैलगाडी व सहा खाचरं जुंपली. खाचारमध्ये सर्व सेवक बसले आणि बैलबंडीत सर्व सामान भरले. सर्व मिळून वनभोजनास जायला निघालो. ते उन्हाळ्याचे दिवस असुनसुध्दा आकाशात ढग आले होते. हवामान फारच सुंदर होते. ही सर्व बाबांचीच कृपा होती. बाबांना वाटत होते की, सेवकांना उन्हाचा त्रास होऊ नये. म्हातारा गवळी त्या बैलाकडे पुन्हा पुन्हा मागे फिरुन पाहत होता. म्हातारा बसक्या बैल सामानाच्या बंडीला जुंपला तरीपण जोरजोराने धावत आहे याचे त्याला नवल वाटत होते. तेव्हा तो सर्व सेवकांना म्हणाला, ही सर्व महानत्यागी बाबा जुमदेवजींची कृपा आी. म्हणूनच म्हातारा बैल धावत आहे. मी सुध्दा आठवडाभर तापाने होतो. परंतु बाबा होते. बाबा घरी आल्याबरोबर माझा ताप गेला आणि आठ दिवसानंतर मी आज पोटभर जेवण केले.

मंगरली गावाहून आम्ही सर्वजण सकाळी साडेआठच्या सुमारास निघालो. अडीच तीन तासानंतर मोगरकशा तलावात येऊन पोहोचलो. हा तलाव भंडारा जिल्ह्यात आहे. चांगलीशी जागा पाहून सर्व सामान उतरविले. सोबत आलेली बाया मंडळी तलावावरुन आंघोळ करुन आल्यानंतर त्यांनी स्वयंपाकाला सुरुवात केली. बाबा म्हणाले, दोनचार सेवक इथे थांबा आणि बाकीचे सर्व सेवक आमच्याबरोबर आंघोळीला चला. सर्व सेवक आपआपले कपडे घेऊन बाबांसोबत आंघोळीला निघून गेले. तलावाच्या पुर्व दिशेला स्वयंपाकाची व्यवस्था होती. दक्षिणेकडे चांगलीशी जागा पाहून सर्व जण आंघोळीला गेले. तेथे तलावाच्या किनाऱ्यावर एक जोड नाव होती. एका सेवकाने बाबांना सांगितले, बाबा ही नाव मी पाण्यात घेऊन जातो. मला पोहता पण येते. बाबा म्हणाले, जर तुला नाव चालवता येते तर घेऊन जा. तलावात त्या ठिकाणी दोन हत्ती खोल पाणी होते. त्याच्यापुढे तीन हत्ती आणि त्याच्याही पुढे चार हत्ती असे पाणी होते. नाव थोडी दूर गेल्यानंतर पोहणारे सेवक नावेतुन उडी मारुन पोहू लागले. त्या नावेमध्ये नागपूरचे श्री. मारोतरामजी हरडे(दिवाणजी) पण होते. ते डावीकडच्या नावेत एकटेच उभे होते. त्यांनी नाव चालविण्याकरिता वल्हे उचलले व उजवीकडच्या नावेच्या बाहेर वल्हे पाण्यात घातले. वल्हे पाण्यात घातल्याबरोबर श्री. मोतीरामजी हरडे(दिवाणजी) उजवीकडच्या नावेत पडले. हे दृश्य तळ्याच्या काठावर उभ्या असलेल्या बाबा जुमदेवजींनी पाहिले ते दिवाणजींना म्हणाले, दिवानजी तुम्हाला नाव चालविता येत नाही. तेव्हा तलावात पोहत असलेले श्री. गडीरामजी डोणारकर नावाच्या सेवकाला बाबा म्हणाले, नावेची दोरी पकडा व नावेला काठावर आणून बांधा. नंतर बाबांनी सर्व सेवकांना सांगितले की, आपण लवकर

आंघोळ आटोपून स्वयंपाकाच्या ठिकाणी जाऊ, तेव्हा बाबांनी आंघोळ आटोपली होती. एवढे बोलून बाबा तेथून निघून गेले. निघतेवेळी बाबा पायात पादुका घालायला विसरले. त्यांच्या पादुका तलावाच्या काठावरच राहून गेल्या होत्या.

बाबा तेथून गेल्याचे पाहून सेवकांनी बांधून ठेवलेल्या नावेची दोरी सोडली. काही सेवक नावेत बसून कपडे धुऊ लागले. बाबांनी नाव बांधून ठेवण्याचा आदेश देऊनही सेवकांनी त्या आदेशांचे पालन केले नाही. नावेची दोरी सुटलेली आहे हे पाहून लोहारा गावचे सेवक श्री शामजी कार यांनी नावेला पाय मारला त्यामुळे नाव तरंगत खोल पाण्यात गेली. शामजी कार यांनी नावेला पाय मारल्यामुळे त्यांचा पायही कापला. नाव खोल पाण्यात जात आहे हे पाहून श्री शामजी कार यांचा साडू श्रीराम डोणारकर यांनी पाण्यात उडी मारली आणि पोहत पोहतच ते नावेपर्यंत गेले. नावेला पकडून वर चढत असताना नाव एका बाजूला वाकली. त्यामुळे नावेत बसलेले पाचसहा सेवक पाण्यात पडले. नाव सरळ झाली तेव्हा नाव पाण्याने पूर्ण भरलेली होती. तलावाच्या काठावर उभे असलेले सेवक हे दृश्य पाहून नाव बुडाली, नाव बुडाली असे जोरजोराने ओरडू लागले. त्यांचा ओरडण्याचा आवाज स्वयंपाक करीत असणाऱ्या बायांपर्यंत पोहोचला. तेथे धर्मापुरी ह्या गावाची चंद्रभागाबाई ओरडून म्हणाली,'हे होऊच शकत नाही. बाबांच्या उपस्थितीत नाव बुडूच शकत नाही.' केवढा दृढ विश्वास होता त्या बाईचा बाबांच्या कृपेवर. बाबा दुर अंतरावर गेल्यानंतर त्यांना सेवकांच्या ओरडण्याचा आवाज आला. त्याचक्षणी बाबांच्या पायाला खडे रुतले. तेव्हा बाबांना आपण पादुका घातल्या नाही आणि त्या तलावाच्या काठावरच आपण विसरलो आहोत हे लक्षात आले. बाबा पादुका घालण्याकरिता तलावावर परत आले. तेव्हा बाबांनी पाहिले की जोड नावेत पूर्णपणे पाणी भरुनही ती नाव पाण्यात तरंगत आहे. पाण्याने भरलेल्या नावेत नागपूरचे श्री. लक्ष्मणराव उराडे एकटेच उभे होते. जेव्हा नाव झुकली तेव्हा ते नावेची पाटी धरुन होते. त्यामुळे ते पडले नाहीत आणि नाव सरळ झाल्यावरही ते उभे होते. त्यांना पोहता येत नव्हते. तेव्हा त्यांनी विचार केला, तलावात उडी मारली तर मरतो आणि उडी मारली नाही तरी मरतो. तेव्हा परमेश्वराला प्रार्थना केली व म्हटले, ''मरे या जिये भगवत् नामपर. बाबा हनुमानजी आप मुझे मारो, या तारो आपके शरण मैं हूँ।'' तलावाच्या किनाऱ्यावर बाबा जुमदेवजींच्या जवळच मांदरी गावचा कचरु नावाचा एक सेवक उभा होता. बाबांनी त्याला तुला पोहता येते काय असे विचारले. त्यांनी होय म्हटल्यावर बाबांनी त्याला पोहत जाऊन नावेची दोरी धरुन ती ओढत किनाऱ्यावर आणायला सांगितली. तेव्हा त्यांनी पोहत जाऊन नाव किनाऱ्यावर ओढत आणली तरी त्या नावेत पूर्णपणे पाणी भरलेले होते. तरीपण नाव बुडाली नाही. नाव किनाऱ्यावर ओढत आणल्यानंतर नावेत भरलेले पाणी सेवकांनी मिळून बाहेर फेकले. हा केवढा मोठा साक्षात्कार आहे, बाबांच्या परमेश्वरी कृपेचा.

जेव्हा नाव तलावात उमटली तेव्हा त्या नावेत कपडे धूत असेलेल सेवक पाण्यात बुडाले होते. त्यापैकी ज्यांना पोहता येत होते ते पोहत काठावर आले. पाण्यात बुडणाऱ्या सेवकांमध्ये गोपीचंद नावाचा सेवक सुध्दा होता. त्याला पोहता येत नव्हते. तो पाण्यातच होता. त्याच्याच बाजूला संपत नावाचा सेवक सुध्दा पाण्यात पडला होता. गोपीचंदने संपतला कवटाळून पकडून ठेवले होते. संपतला पोहता येत होते. आपल्याला कोणीतरी पकडले आहे. आता आपण मरणार असे संपतला वाटले. म्हणून त्याने परमेश्वरला प्रार्थना केली, भगवान बाबा हनुमानजी मला वाचवा. मी आता मरतो आहे, तेव्हा परमेश्वराची कृपा त्याच्यावर झाली. आणि गोपीचंदचा हात आपोआपच सुटला. संपतने पोहचण्याकरिता पाण्यावर थाप मारल्याबरोबर त्याच्या हातात गोपीचंदचे धोतर आले. ते तसेच पकडून संपतने पोहत–पोहत त्याला काठावर आणले. परमेश्वर दिसत नाही. परंतु परमेश्वराचे गुण आपण पाहू शकतो. तलावात पडलेले सर्वच सेवक सुखरुपपणे काठावर आल्यानंतर सर्वांनी मिळून भगवान बाबा हनुमान जी की जय। महानत्यागी बाबा जुमदेवजी की जय । परमात्मा एक । असा जयघोष करुन सर्व सेवक बाबांसोबत स्वयंपाकाच्या ठिकाणी जाण्याकरिता निघाले. रस्त्यावर तिथल्या चौकीदाराची झोपडी होती. झोपडीसमोर चौकीदार व जंगलात काम करणारे काही मजूर उभे होते. ते सर्व म्हणू लागले. तुमचे गुरु सोबत असल्यामुळे आपणा सर्वांचे प्राण वाचले आहे. आम्ही आतापर्यंत हे पाहिले की ह्या तलावात ढिवर लोकसुध्दा मासळी पकडत नाही. कारण ह्या तलावात पुष्कळ जाळे असल्यामुळे ते घाबरतात. जो कोणी तलावात उडी मारतो तो त्या जाळ्यात अडकुन मरतो. अशा काही घटना आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहिल्या आहेत. धन्य आहेत आपले बाबा त्यांच्यामुळे आपण सर्वांचे प्राण वाचले. त्यानंतर सर्व सेवक स्वयंपाकाच्या ठिकाणी आले. सर्वांनी मिळून परमेश्वराच्या नावाचा जयघोष करुन भोजन केले. त्याच दिवशी रात्री आठ वाजता आम्ही मंगरली गावातील सेवकाच्या घरी येऊन पोहोचलो.

रात्री घरी पोहोचल्यानंतर भगवतकार्याची चर्चा बैठक सुरु झाली. बैठकीत उपस्थित असलेल्या सेवकांनी ह्या मार्गावर बाबांनी जे शिकवले तसेच कुटुंबात सत्य, मर्यादा व प्रेमाने वागल्यामुळे व वाईट व्यसन बंद केल्यामुळे जीवनात जो अनुभव आला त्याबद्दल आपआपले विचार मांडले. चर्चा बैठक रात्री १२ वाजेपर्यंत चालली. बैठक समाप्त झाल्यानंतर महानत्यागी बाबा जुमदेवजींनी त्या गावातल्या सेवकांना म्हटले, आम्ही दोन दिवसापासून या ह्या गावात आलो पण आम्हाला इथे दुधाचा चहा प्यावयास मिळालेला नाही. आता आम्हाला दुधाचा चहा पाहिजे. तो सेवक बाबांना म्हणू लागला, बाबा एवढ्या रात्री ह्या जगलाम दुध कोठून मिळणार ? माझ्या घरी म्हशी आहेत परंतु त्या जेव्हा जंगलात चरावयास गेल्यास तेव्हा वासरुसुध्दा त्यांच्यासोबत होते. त्या वासराने संपूर्ण दुध पिऊन टाकले. म्हशी जेव्हा सायंकाळी जंगलातून चरुन आल्या तेव्हा दुध काढण्यासाठी गेलो. परंतु म्हशीने एक थेंब सुध्दा

दुध दिले नाही. आता सांगा बाबा, दुध कोठून मिळेल? तेव्हा बाबा त्या सेवकाला म्हणाले, दुध कोठून मिळेल, हे माहित नाही. तुम्ही दुध कोठूनही आणा परंतु आम्हाला दुधाचा चहा पाहिजे. बाबाचे हे शब्द ऐकून तो म्हातारा गवळी सेवक म्हणाला. बाबा माझे ऐंशी वर्षांचे वय आहे व माझा असा अनुभव आहे की, एवढ्या रात्री दुध मिळणार नाही. त्यावर बाबा जुमदेवजी म्हणाले आम्हाला आपल्या अनुभवाचे काही करायचे नाही. आम्हाला तर दुधाचा चहा पाहिजे. तेव्हा त्या सेवकाने बाबांना विनंती केली की बाबा आम्हाला दुध कोठून मिळू शकेल याबद्दल मार्गदर्शन करावे. बाबा जुमदेवजी म्हणाले, आपण एका परमेश्वराची कृपा प्राप्त केली आहे. परमेश्वर दुध देईल. त्यानंतर त्या सेवकाला बाबा म्हणाले, तुम्ही ज्या म्हशीला धुतले होते त्याच म्हशीला समोर घेऊन या आणि घरात जाऊन भगवान बाबा हनुमानजींच्या फोटोपर्यंत अगरबत्ती लावून म्हणा, भगवान बाबा हनुमानजी, महानत्यागी बाबा जुमदेवजींना दुधाचा चहा पाहिजे ती बाबांकरिता दुध द्या. एवढे बाबांनी सांगितल्यावर त्या सेवकाने घरी जाऊन परमेश्वराला विनंती केली. नंतर बाहेर येऊन भगवान बाबा हनुमानजीचे नामस्मरण केले व म्हशीच्या पाठीवर थाप मारली. नंतर ते दुध काढण्याकरिता बसले. चर्-चर् करीत दुधाची धार निघू लागली. नागपूर जिल्ह्यातील कुही रोडवर नवरगावाचे सरपंच बाबासोबत होते. त्यांना म्हैस दुध देईल असा विश्वास वाटत नव्हता. त्यामुळे ते म्हशीजवळ जाऊन पाहू लागले. म्हशीने दुध दिले तेव्हा तो दुधाचा गंज उचलून ते बाबांना सांगू लागले. बाबा हे तर दोन लिटर दुध आहे. त्यावर बाबा म्हणाले, संपुर्ण दुधाचा चहा बनवा आणि सर्व सेवकांना द्या. त्यातून एक थेंबसुध्दा दुध ठेवू नका. त्यानंतर म्हातारा गवळी म्हणू लागला, ''बाबा दुसरी म्हैससुध्दा दुध देईल काय?'' त्यावर बाबा म्हणाले, तुम्ही तुमच्या अनुभवाने पाहा, दुध मिळते किंवा नाही. परमेश्वर देतो परंतु मानवाचा परमेश्वरावर विश्वास नाही. वरील अनुभवावरुन हे सिध्द होते की परमेश्वर मानवाची सर्व इच्छा पुर्ण करतो परंतु त्याकरिता मानवाने सत्यकर्म करावयास हवे.

*भगवान बाबा हनुमानजी की जय ।*
*महानत्यागी बाबा जुमदेवजी की जय ।।*
*परमात्मा एक ।।।*

*सत्य, मर्यादा, प्रेम कायम करनेवाले,*
*अनेक वाईट व्यसन बंद करनेवाले*
*मानव धर्म की जय ।।*

* * * * *